तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ९ एप्रिल २०२५

आतील पानावर

पान २ – रिलेशनशिपचा आईस्क्रीमप्रमाणे...
पान ३ – दाक्षिणात्य इंडस्ट्री तांत्रिकदृष्ट्या पुढे पण...
पान ५ – प्रभासच्या 'कन्नपा'चा टीजर रिलीज
पान ६ – अशोकसारखा नवरा मिळणं हे ...
पान ७ – बॉलीवूडवर सध्या संकट घोंघावतय

# करीना करणार हॉलिवूडमध्ये एन्ट्री?




बॉलिवूडची बेबो अशी ओळख असणारी लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे करीना कपूर खान. करीना गेली अनेक वर्ष बॉलिवूडमध्ये सक्रीय आहे. विविध सिनेमांमधून करीना प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. करीनाने विविध भूमिकांमधून बॉलिवूडमधील उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून नाव मिळवलं. अशातच करीना आता थेट हॉलिवूडमध्ये अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार, अशी चर्चा आहे. त्यामुळे करीनाच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. हॉलिवूड पदार्पणाबद्दल करीना काय म्हणाली? जाणून घ्या...

करीना कपूर अलीकडेच एका इव्हेंटमध्ये सहभागी झाली होती. त्यावेळी करीनाला हॉलिवूड डेब्यूबद्दल प्रश्न विचारण्यात आला. करीनाने हॉलिवूड पदार्पणाच्या प्रश्नावर जास्त काही वक्तव्य केलं नाही. याविषयी ती योग्य विचार करुन निर्णय घेणार आहे, असं तिच्या हावभावांवरुन सर्वांना जाणवलं. याशिवाय करीनाचा गंमतीशीर अंदाज सर्वांना बघायला मिळाला. माझ्या वॅनिटी वॅनमध्ये जे घडतं, ते तिथेच राहतं. बाहेर येत नाही, अशा वाक्यात करीनाने उत्तर देऊन तिचा हजरजबाबीपण दाखवला. करीनाच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं तर २०२४ मध्ये करीनाचा 'सिंघम अगेन' सिनेमात दिसली. या सिनेमात करीनाने अजय देवगणच्या पत्नीची भूमिका साकारली. दिवाळीत रिलीज झालेल्या या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. करीना आता लवकरच मेघना गुलजार यांच्या 'दायरा' सिनेमात झळकणार आहे. याशिवाय 'वीरे दे वेडींग २' सिनेमात करीना दिसणार आहे. करीनाची भूमिका असलेला 'द बंकिंगहम मर्डर' हा सिनेमाही ओटीटीवर चांगलाच लोकप्रिय ठरला.

अभिनेता विजय वर्मा गेल्या काही दिवसांपासून वैयक्तिक आयुष्यामुळे खूप चर्चेत आहे. विजयचा तमन्ना भाटियाशी ब्रेकअप झाल्याची चर्चा होत आहे. अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवरील विजयबरोबरचे फोटो डिलीट केल्यापासून दोघांमध्ये बिनसलं असल्याचं म्हटलं जात आहे. पण, काही दिवसांआधी विजय व तमन्ना एकाच ठिकाणी धुलीवंदन साजरी करताना दिसले. रवीना टंडनच्या घरी धूळवड खेळतानाचे विजय व तमन्नाचे फोटो व्हायरल झाले होते, त्यामुळे दोघांचा ब्रेकअप झाला आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे. अशातच विजय वर्माने रिलेशनशिपसंबंधित केलेलं वक्तव्य सध्या खूप चर्चेत आलं आहे. अभिनेत्याने रिलेशनशिपची तुलना आइस्क्रीमशी केली आहे. अभिनेता विजय वर्माने एका मुलाखतीत रिलेशनशिपबाबत आपलं मत मांडलं. विजय वर्मा म्हणाला, 'जर तुम्ही रिलेशनशिपचा आईस्क्रीमप्रमाणे आस्वाद घेतला तर तुम्ही नेहमीच आनंदी रहाल, त्यामध्ये तुम्हाला कोणताही फ्लेवर मिळो, तो स्वीकारा आणि पुढे चला. याच वक्तव्यामुळे विजय सध्या चर्चेत आला आहे. दरम्यान, नेटफ्लिक्सवरील 'लस्ट स्टोरीज २' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान विजय वर्मा आणि तमन्ना भाटियाची पहिली भेट

# रिलेशनशिपचा आईस्क्रीमप्रमाणे आस्वाद घ्या



झाली होती. त्यानंतर दोघांची चांगली मैत्री झाली. दोन वर्षांपूर्वी जेव्हा न्यू इअरच्या गोव्यातील पार्टीमध्ये विजय आणि तमन्ना एकत्र दिसले, तेव्हापासून त्यांच्या अफेअरच्या चर्चांना उधाण आलं. त्यानंतर दोघं मुंबई विमानतळावरही एकत्र पाहायला मिळाले. 'लस्ट स्टोरीज २' चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी विजय व तमन्नाने प्रेमाची कबुली दिली. पण, मार्च महिन्याच्या सुरुवातीला दोघांचा ब्रेकअप झाल्याचं समोर आलं. मात्र, अद्याप विजय व तमन्नाने ब्रेकअप झाल्याचं अधिकृतरित्या जाहीर केलेलं नाही. वृत्तानुसार, विजय व तमन्नाने ब्रेकअपनंतर दोघांमध्ये चांगली मैत्री ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दोघं अजूनही इन्स्टाग्रामवर एकमेकांना फॉलो करत आहेत. विजय वर्माच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर लवकरच तो 'मटका किंग' वेब सीरिजमध्ये पाहायला मिळणार आहे. याशिवाय तो बर्याच सीरिज व चित्रपटांमध्ये झळकणार आहे. तसंच तमन्ना भाटिया अलीकडेच दाक्षिणात्य चित्रपट 'ओडेला २'मध्ये दिसली. या तेलुगू चित्रपटात तिचा एक वेगळाच अवतार पाहायला मिळाला.

# चंडिका चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित

महिलांना प्रेरणा देण्याचे कार्य समाजात केले जाते, यापैकीच महत्वाचे योगदान देतात ते म्हणजे चित्रपट. सध्या मराठी सिनेश्रुष्टीत महिल-प्रधान सिनेमांकडे प्रेक्षकांचं लक्ष वेधलं गेलंय. स्त्रीकेंद्री चित्रपटांना सिनेप्रेमींचं प्रेम सुद्धा मिळतंय. असाच एक नवा मराठी चित्रपट येत्या नवीन वर्षी आपल्या भेटीस येणार आहे. आनारसा स्टुडिओज प्रस्तुत, योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित आणि निर्मित चंडिका ह्या सिनेमाचं पोस्टर रिलीज करण्यात आलं.

वन फोर थ्री (१४३) आणि आम्ही जरांगे सारखा दमदार आणि सर्वाधिक चर्चेत आलेले चित्रपटाचे दिग्दर्शक योगेश भोसले पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मनोरंजन करायला सज्ज आहेत. पोस्टरवर असलेल्या महिलेच्या कपड्यांवर आणि अंगावर सर्वत्र रक्त आहे, मागे सध्याचं जग आपण पाहू शकतो. विशेष म्हणजे या महिलेच्या उजव्या हातात शस्त्र आहे ज्याला आपण त्रिशूल म्हणतो. या दमदार पोस्टर वरूनच हा सिनेमा किती ताकदीचा असणार आहे ह्याचा अंदाज आहे.




# 'हीरामंडी'नंतरही अदितीला मिळेना काम



बॉलिवूड अभिनेत्री अदिती राव हैदरी २०२४ सालातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या सेलिब्रिटींपैकी एक होती. यामागे दोन कारणे होती. एक म्हणजे अभिनेता सिद्धार्थसोबत तिचे लग्न. पण त्याआधी तिची 'हीरामंडी'मधील गजगामिनी चाल चर्चेत आली होती. अभिनेत्रीची तुलना मीना कुमारीशी केली जात होती. या मालिकेनंतर कोणतीही ऑफर आली नसल्याचे तिने सांगितले. अभिनेत्री अदितीने खुलासा केला की, तिचा पती आणि अभिनेता सिद्धार्थशी लग्न करण्याचा निर्णय घेण्यास तिला एक सेकंदही लागला नाही. व्लॉगमध्ये फराहने आदितीला विचारले की, तो कोणता क्षण आहे जेव्हा तिने सिद्धार्थशी लग्न करायचे ठरविले. यावर अभिनेत्री म्हणाली, 'अरे देवा, एक सेकंदही लागला नाही. तो खूप मजेशीर आणि छान व्यक्ती आहे, त्याच्यात नकलीपणा नाही. तुम्ही जे पाहता ते तुम्हाला मिळते आणि तो खूप गोड आहे. ती पुढे म्हणाली की, 'जर त्याला माहित असेल की कोणीतरी माझ्या खूप जवळ आहे आणि माझ्या आयुष्याचा एक भाग आहे, तर तो सगळ्यांना एकत्र आणतो. मी पण अशीच मोठी झाली आहे आणि माझे त्याच्यावर खूप प्रेम आहे. फराह खानने हेदेखील सांगितले की, एका मुलाखतीत अदितीने सांगितलं होतं की, दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्या 'हीरामंडी: द डायमंड बाजार'मध्ये काम केल्यानंतर तिला वाटलं की ती तिच्या करिअरमध्ये एका खास टप्प्यावर पोहचली आहे. अदितीने सांगितले की, काहीच नाही. हीरामंडी सोडा, सब्जी मंडीमध्येही नाही. कारण हीरामंडीनंतर सगळीकडून तिचे खूप कौतुक झाले.

# अजयचा 'रेड २' येणार लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस

अभिनेता अजय देवगणच्या 'रेड' चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. आता या चित्रपटाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. 'रेड २'ला मुहुर्त मिळाला असून लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाची रिलीज डेट अनेकदा पुढे ढकलण्यात आली होती. मात्र आता या चित्रपटाच्या रिलीज डेटवर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. 'रेड २' हा सिनेमा आता १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यात अजय देवगण पुन्हा एकदा आयकर विभाग अधिकार्याच्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमात रितेश देशमुख खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. याआधी हा सिनेमा १५ नोव्हेंबर २०२४ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार होता. पण, 'सिंघम अगेन' या चित्रपटाच्या कामाला उशीर झाल्याने रेड २ च्या प्रदर्शनाच्या तारखेत बदल करण्यात आला होता. त्यानंतर फेब्रुवारी २०२५ मध्ये सिनेमा रिलीज होणार असल्याचे म्हंटले जात होते. मात्र त्यातही बदल करण्यात आला. अखेर आता रेड २'ची नवी रिलीज डेट जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, २०१८ साली प्रदर्शित झालेल्या 'रेड' या सिनेमाचा हा सीक्वल असणार आहे. ज्यामध्ये अजय देवगण आयकर विभाग अधिकार्याच्या भूमिकेत दिसला होता. आता 'रेड २'साठी प्रेक्षक उत्सुक आहेत. या सिनेमाचे दिग्दर्शन राज गुप्ता यांनी केले आहे.



# आवारापनः २ मध्ये दिसणार इमरान हाश्मी



इमरान हाश्मीने त्याच्या चाहत्यांना आश्चर्यचकित केले आहे. या अभिनेत्याने 'आवारापन २' ची घोषणा केली आहे, जो त्याच्या २००७ च्या 'आवारापन' चित्रपटाचा सिक्वेल आहे. या चित्रपटात श्रिया सरन आणि मृणालिनी शर्मा देखील होत्या. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला, परंतु गेल्या काही वर्षांत त्याला एक लोकप्रियता मिळाली आहे आणि 'आवारापन' मधील गाणी अजूनही प्रेक्षकांना आवडतात. इम्रानने एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये आवारापनमधील काही दृश्ये आहेत आणि शेवटी त्याचे पात्र जागे होते हे दाखवले आहे.

'आवारपण' च्या शेवटी, अभिनेत्याचे पात्र शिवम मरण पावते आणि यामुळे प्रेक्षकांना प्रश्न पडला की तो जिवंत राहील की त्याचा सिक्वेल वाढवला जाईल. तथापि, कथा पुढे जाईल की 'आवारापन २' हा पहिल्या भागाचा सिक्वेल असेल हे अद्याप माहित नाही. चित्रपटाची रिलीज डेटही जाहीर झाली आहे. हा चित्रपट पुढील वर्षी म्हणजे ३ एप्रिल २०२६ रोजी प्रदर्शित होईल. अभिनेता इम्रान खानने सोशल मीडियावर या सिक्वेलची घोषणा केली, जो पुढील वर्षी एप्रिलमध्ये प्रदर्शित होईल. विशेष म्हणजे, गेल्या वर्षीच, इमरान आणि श्रिया डिस्ने प्लस हॉटस्टारवर प्रसारित होणाऱ्या शोटाइम मालिकेत एकत्र दिसले होते. जरी ते एकमेकांसोबत नव्हते, तरी दोघांचे अनेक सीन एकत्र होते आणि चाहते त्यांना शोमध्ये पाहून खूप आनंदी झाले. 'आवारापन २' मध्ये इम्रान खान मुख्य भूमिकेत दिसणार आहे पण निर्मात्यांनी अद्याप मुख्य अभिनेत्रीचे नाव जाहीर केलेले नाही.

# दाक्षिणात्य इंडस्ट्री तांत्रिकदृष्ट्या पुढे पण...

बॉलिवूडचा 'भाईजान' सलमान खान सध्या चर्चेत आहे. त्याचा आगामी 'सिकंदर' सिनेमा ईदच्या मुहुर्तावर सर्वत्र प्रदर्शित होत आहे. या सिनेमाचं दिग्दर्शन ए.आर. मुरुगदास यांनी केलं आहे. सध्या साऊथ सिनेमे, साऊथ दिग्दर्शक, फिल्ममेकर्सची चलती आहे. बॉलिवूडमध्येही आता ते एन्ट्री घेत आहेत. ॲटलीनंतर ए.आर. मुरुगदासही हिंदीत नशीब आजमावत आहेत. काही दिवसांपूर्वी अनुराग कश्यप आणि सनी देओल यांनी साउथचं कौतुक केलं. हिंदीतील फिल्ममेकर्सने साउथकडून शिकलं पाहिजे असंही सनी देओल म्हणाला. आता यावर सलमानने खाननेही भाष्य केलं आहे. सलमान खानने काल 'सिकंदर'च्या प्रमोशननिमित्त माध्यमांशी संवाद साधला. वेगवेगळ्या विषयांवरील प्रश्नांवर त्याने उत्तरं दिली. साउथ इंडस्ट्रीचं अनेकजन कौतुक करत आहेत. यावर तो म्हणाला, दाक्षिणात्य इंडस्ट्री तांत्रिकदृष्ट्या खूप पुढारलेली आहे. भावनिकरित्याही ते पुढे आहेत. ते नेहमीच काही ना काही नवीन आणतात. सिनेमातून दुसरा सिनेमा बनवत नाहीत. ते मात्र तिथेही जे सिनेमे चालतात तेच आपल्याला कळतात. जसे हिंदीतील काही चित्रपट हिट होतात. तसंच साउथमध्ये दर आठवड्याला दोन-तीन सिनेमे रिलीज होत असतात. त्यातले काही सिनेमेच गाजतात जे आपल्या कानावर येतात. त्यामुळे सगळीकडे सारखंत आहे. चांगले सिनेमे बनवाल तर ते चालतील. टलीसोबतचा सिनेमा येणार की नाही? यावर सलमान म्हणाला, हा सिनेमा सध्या बनतोय असं मला वाटत नाही. एक वेळ होती जेव्हा याचं काम सुरु होतं. आम्ही गोष्टी जमवून आणण्यासाठी खूप प्रयत्न केले. पण जमलं नाही. मला वाटतं सिनेमाच्या बजेटमुळे हे घडलं. कारण खूप हाय बजेटचा हा सिनेमा होता. त्यामुळे आता तो पुढे ढकलला आहे. दोन सिनेमांएवढा वेळ त्यात गेला असता. आता मला एक सिनेमा करायला वेळ मिळाला आहे.



# ...गर तुम भुला ना दोगे!

# आगळावेगळा ब्रिज...!

**एकंदरीत जगाच्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला तर एक बाब प्रकर्षाने लक्षात येते की, काही व्यक्ती या सार्वकालिक असतात. म्हणजे त्यांना सदोदित महत्त्व असतेच असते तसेच काही घटना या इतिहासात कालचक्र बदलवणाऱ्या म्हणूनच सदैव स्मरणात राहतात. याचीच दुसरी बाजू अशी की, बहुसंख्य व्यक्ती व घटना त्या विशिष्ट कालावधीत प्रभावशाली असतात. त्या कालखंडाला त्यांनी व्यापून टाकले असते. पण काही वर्षांनंतर, नवीन पिढीला तरी हा प्रश्न पडतो की, या व्यक्ती व घटना यामध्ये असे काय विशेष होते; जेणेकरून त्यांचा इतका सर्वंकष प्रभाव त्या कालखंडावर पडावा? ही बाब सर्वच क्षेत्रांना कमी-अधिक प्रमाणात सदोदित लागू पडते, हे मात्र निश्चित.**

हिंदी चित्रपटांपुरता विचार करायचा तर ठळक वैशिष्ट्ये असलेल्या तीन अथवा चार कालखंडांची कल्पना आपण करू शकतो. १९१३ ते १९३१ हा मूकपटांचा कालखंड, १९३१ (बोलपटांची सुरुवात) ते १९५० (पहिला टप्पा), १९५१ ते १९७० (महानायक, अतुलनीय संगीतकार व गायक-गायिकांचा सुवर्ण- कालखंड) व १९७० ते १९९० च्या दशकापर्यंतचा मुख्यत्वे धंदेवाईक व मसाला चित्रपटांचा महत्त्वपूर्ण कालखंड, अशी ढोबळमानाने कालखंड-निश्चिती आपण करू शकतो.

१९७० च्या दशकात आपल्या विशिष्ट धाटणीच्या चित्रपटांनी, आपला वेगळा ठसा उमटवणाऱ्या ब्रिजमोहन सदाना उर्फ ब्रिज यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. ८ ऑक्टोबर १९३३ रोजी गुजरांवाला, पाकिस्तान येथे जन्माला आलेल्या ब्रिज यांच्या सुरुवातीच्या आयुष्याची फारशी माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. अर्थात भारताच्या फाळणीमुळे पाकिस्तानातून भारतात यावे लागलेल्या इतर अनेक कलावंतांप्रमाणे त्यांनीही मुंबईकडे आपले नशीब आजमावण्यासाठी प्रस्थान केले. 'भूले भटके' (१९५६) हा त्यांचा दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट मास्टर भगवान या चित्रपटाचे नायक होते. त्यांचा पुढील चित्रपट 'नई राहें' हा अशोककुमार, गीता बाली, अनुपकुमार अभिनित एक सामान्य कौटुंबिक पट होता. ब्रिज यांना ओळख मिळाली ती १९६० सालच्या 'तू नही और सही' या चित्रपटाने. प्रदीपकुमार, कुमकुम, निशी कोहली अशी बव्हंशी दुय्यम दर्जाची अभिनेते मंडळी असूनही 'ये रंगभरे बादल, ये उडता हुआ आचल' या व इतर लोकप्रिय गीतांनी चित्रपट बऱ्यापैकी यशस्वी ठरला. संगीतकार रवी यांचे सुमधुर संगीत चित्रपटास तारून नेते झाले. पण, ब्रिज यांची ओळख बनलेली चित्रपटशैली उदयास आली १९६३ च्या 'उस्तादों के उस्ताद' चित्रपटापासून. प्रदीपकुमार, अशोककुमार, शकीला, शेख मुख्तार या अभिनेत्यांनी सजवलेला 'उस्तादों के उस्ताद' अनेक अर्थाने हिंदी चित्रपटसृष्टीत यशस्वी ठरला. हीच शैली वापरून नंतर अनेक दिग्दर्शकांनी आपले चित्रपट यशस्वी केले. 'ये रात फिर ना आयेगी' (१९६६) च्या यशाने ब्रिज आघाडीचे व लोकप्रिय दिग्दर्शक म्हणून मान्यता पावले. विशेषतः या चित्रपटाचे ओ.पी. नय्यर यांनी रचलेले संगीत अती- कर्णमधुर होते. चित्रपट चालवणाऱ्या वर्गास ब्रिज यांचे वेगवान चित्रपट विशेषत्वाने आवडू लागले ते याच काळात. पुढील वर्षी आलेल्या 'नाईट इन लंडन'ने ब्रिज यांचे परिष्कृत चित्रपट प्रारूप अधिक चकचकीत केले. मूलतः शहरात घडणाऱ्या, अघो-जगताशी संबंधित चित्रपट कथा हे ब्रिज यांचे बलस्थान व विशेष आवड.

१९६९ साली आलेल्या 'यकीन' चित्रपटाने ब्रिज यांच्या प्रारूपावर शिक्कामोर्तब झाले. अर्थात त्याचवर्षी आलेल्या 'दो भाई' या चित्रपटातदेखील 'ब्रिज-विशेष' मनोरंजन मसाला होताच. अगोदरच विशद केल्याप्रमाणे, १९७० च्या दशकात हिंदी चित्रपटांच्या मांडणी व स्वरूपामध्ये जाणवण्याइतपत बदल झाले. बाळबोध, उपदेशपर व भारतीय संस्कृतीचे गोडवे गाणाऱ्या सरधोपट चित्रपटांपेक्षा वेगळे, स्वातंत्र्यानंतरच्या काळात जन्माला आलेल्या पिढीचे अनुनय करणाऱ्या पाश्चात्त्य वळणाच्या व धाटणीच्या बव्हंशी गल्लाभरू चित्रपटांचा या दशकात बोलबाला होता.



गीत- संगीतांचे सुवर्णयुग हळूहळू संपुष्टात येत होतेच व हाणामारी, धीट प्रणय- प्रसंग यांचा वाढता प्रभाव हेदेखील या दशकाचे व्यवच्छेदक लक्षण..! अशा पृष्ठभूमीवर ब्रिज यांना कालातीत यश मिळवून देणारा कचकचीत, कडक चित्रपट म्हणजे 'व्हिक्टोरिया नं. २०३' (१९७२). जेम्स हॅडले चेसच्या 'देअर इज हिप्पी ऑन हायवे' या कादंबरीवर आधारित या चित्रपटात अशोककुमार व प्राण यांची बेहतरीन अदाकारी होती. रहस्य, रोमांच, विनोद, हाणामारी व कौटुंबिक प्रसंग यांची अप्रतिम सरमिसळ असलेला हा चित्रपट म्हणजे १९७० च्या दशकातील एक सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक चित्रपट. यानंतर आलेले 'पैसे की गुडियां' व 'कठपुतली' हे चित्रपट सुमार दर्जाचे होते. ब्रिज यांचा प्रभाव दाखवणारा १९७० च्या दशकातील चित्रपट होता, 'चोरी मेरा काम' (१९७५) व थोड्याफार प्रमाणात 'एक से बढकर एक' (१९७६). 'मगरूर' (१९७९) 'बॉम्बे ४०५ माईल्स' (१९८०) हे चित्रपट केव्हा आले व केव्हा गेले तेही समजले नाही. निर्मिती अवस्थेत बराच काळ रखडलेल्या व शेवटी १९८१ साली प्रदर्शित झालेला 'प्रोफेसर प्यारेलाल' हा चित्रपट चांगला असूनही चित्रपट रसिकांनी त्यास अव्हेरले. या चित्रपटात 'गा गा गायेजा और मुस्कुराये जा' व 'तेरे सिवा ना किसीका बनूंगा' ही दोन सुश्राव्य गीते होती.


इथे ब्रिज यांच्या कल्याणजी-आनंदजी यांच्या समवेतच्या संगीत साहचर्याचा (विशेषतः १९७० च्या दशकातील) प्रशंसनीय उल्लेख विशेषत्वाने करणे गरजेचे आहे. 'पैसे की गुडिया' व 'मगरूर' हे दोन चित्रपट वगळता, त्यांच्या १९७० च्या दशकातील इतर सर्व चित्रपटांचे संगीत कल्याणजी- आनंदजी यांनी दिले होते. पाश्चात्त्य धाटणीच्या वेगवान संगीत व पार्श्वसंगीताने या चित्रपटांना एक अनोखे परिमाण मिळाले, हे निर्विवाद. १९८० च्या दशकात १९८३ चा 'तकदीर', १९८५ चा 'उँचे लोग' व १९८८ चा 'मर्दोंवाली बात' हे ब्रिज यांचे दिग्दर्शक म्हणून अखेरचे चित्रपट. जरी हे चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी ठरले असले, तरी ब्रिज यांचा प्रभाव साफ ओसरला होता. व्यावसायिक अपयशातून आलेल्या कर्जाने व नैराश्याने ब्रिज साफ कोलमडून गेले. १९६० च्या दशकातील मोहक खळीदार हास्य असलेली नायिका सईदा खान ही त्यांची पत्नी होती.

आपल्या सुपुत्राच्या वाढदिवशी म्हणजे २१ ऑक्टोबर १९९० च्या संध्याकाळी प्रचंड संतापलेल्या व नशेत असलेल्या ब्रिज यांनी प्रथम आपली पत्नी व मुलगी नम्रता यांचा गोळ्या झाडून खून केला व नंतर, लगोलग स्वतःवर गोळ्या झाडून स्वतःलाही संपवून घेतले. भेदरलेला व लपून बसलेला, कमल सदाना हा कुटुंबाचा एकमात्र वाचलेला सदस्य. एका क्षणात होत्याचे नव्हते करून ब्रिज आपल्या अनंताच्या यात्रेला निघून गेले. मागे उरल्या त्या केवळ त्यांच्या वेगवान व चटकदार चित्रपटांच्या आठवणी, ज्यांनी १९७० चे दशक खरोखर गाजवले. आजच्या नवीन पिढीला तर या चित्रपटांची व चित्रपट दिग्दर्शकाची सुतरामही ओळख नाही. कालाय तस्मै नमः!

(लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

देवेंद्र प्रभुणे

# 'फुले' चित्रपटात प्रतीक गांधी मुख्य भूमिकेत



झी स्टुडिओज् प्रस्तुत, डान्सिंग शिवा फिल्म्स आणि किंग्जमेन प्रोडक्शन्स निर्मित 'फुले' या हिंदी चित्रपटाचा बहुप्रतिक्षित ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला. महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या समाजसुधारणेच्या संघर्षमय वाटचालीवर आधारित हा चित्रपट ११ एप्रिल २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. विशेष म्हणजे त्याच दिवशी महात्मा फुले यांची जयंतीही आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्यासह स्त्री शिक्षण, जातिनिर्मूलन आणि सामाजिक समतेसाठी झुंज दिली. ब्रिटिशकालीन भारतात त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली, शेतकरी आणि वंचित समाजाच्या हक्कांसाठी लढा दिला. त्यांची प्रेरणादायी कथा आता रूपेरी पडद्यावर उलगडणार आहे. महात्मा आणि सावित्रीबाई फुले यांनी उभ्या केलेल्या चळवळींचा आजही आपल्या समाजावर मोठा प्रभाव आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांचा महाराष्ट्र असं कायमच म्हटलं जातं. आता 'फुले' नावाचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे. या चित्रपटातून महात्मा फुलेंचा जीवनपट उलगडला जाणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन राष्ट्रीय पुरस्कार विजेते अनंत नारायण महादेवन यांनी केलं आहे. ऐतिहासिक विषयावर दमदार हातखंडा असलेल्या महादेवन यांनी याआधीही अनेक महत्वाचे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. महात्मा फुले यांच्या भूमिकेत 'स्कॅम १९९२' फेम प्रतीक गांधी दिसणार असून, सावित्रीबाई फुले यांची भूमिका पत्रलेखा साकारत आहे. या दोघांनी या भूमिकांसाठी विशेष तयारी केली असून, त्यांच्या दमदार अभिनयामुळे ही ऐतिहासिक पात्रं जिवंत होतील, असा विश्वास आहे. विनय पाठक हेदेखील एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. 'फुले' चित्रपटाचे निर्माते प्रणय चोक्शी, जगदीश पटेल, रितेश कुडेचा, अनुया चौहान कुडेचा, सुनील जैन आणि डॉ. राज खवारे असून, सहनिर्मितीची जबाबदारी क्रांती शानभाग, कलापी नागडा,रोहन गोडांबे, परीधी खंडेलवाल यांनी उचलली आहे.

# ऋषभ शेट्टीच्या नवीन चित्रपटाची घोषणा

'कांतारा'मुळे फक्त देशभरातच नाहीतर, संपूर्ण जगभरात नावाजलेला अभिनेता ऋषभ शेट्टी सध्या चर्चेत आहे. पण, 'कांतारा पार्ट २' मुळे नाहीतर, त्याच्या आगामी नव्या चित्रपटामुळे. सध्या सोशल मीडियावर ऋषभ शेट्टीच्या अपकमिंग फिल्मचं पोस्टर व्हायरल होत आहे. ऋषभ शेट्टी नवीन चित्रपट घेऊन येत आहे. 'जय हनुमान' असं चित्रपटाचं नाव आहे. ऋषभ शेट्टीनं 'जय हनुमान' चित्रपटाचं शानदार पोस्टर इन्टाग्रामवर शेअर केलं आहे. हा एक बीग बजेट चित्रपट असणार आहे. प्रशांत वर्मा यांच्या 'हनुमान'चा हा सिक्वेल असणार आहे. 'हनुमान' प्रेक्षकांना खूप आवडला होता. यात तेजा सज्जा मुख्य भूमिकेत होता. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये 'जय हनुमान' चित्रपटाचे पहिलं पोस्टर रिलीज करून निर्मात्यांनी चाहत्यांची उत्सुकता वाढवली होती. आता पुन्हा काल निर्मात्यांनी चित्रपटाचं आणखी एक पोस्टर रिलीज केलं. 'कांतारा' चित्रपटात ऋषभ शेट्टीने आपल्या अभिनय कौशल्याने सर्वांना प्रभावित केलं होतं. आता या पौराणिक चित्रपटात तो दिसणार असल्यानं चाहत्यांच्या अपेक्षा वाढल्या. प्रशांत वर्माचा 'हनुमान' हा २०२४ मधील सर्वाधिक कमाई करणारा तेलुगू चित्रपट होता. या चित्रपटाने भारतातील बॉक्स ऑफिसवर २०१.६३ कोटी रुपयांची कमाई केली. प्रशांत वर्माच्या सिनेमॅटिक विश्वातील हा चित्रपट पौराणिक सुपरहिरोवर आधारित आहे. 'जय हनुमान' हा चित्रपट 'हनुमान'सारखा बॉक्स ऑफिसवर धमाल करू शकतो की नाही हे पाहणे उत्सुकतेचे असेल.



# प्रभासच्या 'कन्नपा'चा टीजर रिलीज



साऊथ सुपरस्टार प्रभास आगामी चित्रपट 'कन्नप्पा' मध्ये वेगळ्या भूमिकेत असणार आहे. या चित्रपटाचा टीजर रिलीज धाला आहे. सोबत बॉलिवूड स्टार अक्षय कुमार देखील मुख्य भूमिकेत दिसणार आहे. 'कन्नप्पा' मल्टीस्टारर साऊथ इंडियन चित्रपट आहे. या चित्रपटाचा टीजरची प्रतीक्षा संपली असून साऊथचे अनेक स्टार्स मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. विष्णु मांचू देखील महत्त्वाच्या भूमिकेत असेल. टीजरमध्ये या चित्रपटाची झलक पाहायला मिळत आहे. 'कन्नप्पा'चा १ मिनिट २५ सेकंदाचा टीजर रिलीज झाला आहे. त्याची सुरुवात एका आवाजाने होते. त्यामध्ये ऐकू येतं की, 'संकट का समय हमारे बहुत निकट आ पहुंचा है, शत्रु यमदूतों की तरह हमारे कबीले का नाश करने आ रहे हैं' चित्रपट निर्माते, अभिनेते विष्णु मांचू एक योद्धाच्या भूमिकेत असणार आहे. अक्षय कुमार भगवान शिव आणि काजल अग्रवाल माता पार्वती यांच्या अवतारात दिसणार आहेत. शेवटी प्रभासची एन्ट्री दाखवण्यात आलीय.

# अल्लू अर्जुन बदलणार त्याचं नाव!

साऊथचा सुपरस्टार अल्लू अर्जुन लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. 'पुष्पा' सिनेमानंतर देशभरात त्याचे फॅन फॉलोव्हिंग वाढले आहे. त्याच्या 'पुष्पा २' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर प्रचंड कमाई तर केलीच पण त्याची कारकीर्दही सातव्या आसमानवर पोहचली आहे. दरम्यान, आता तो नाव बदलणार असल्याच्या बातम्या येत आहेत. अहो घाबरू नका! तो पूर्ण नाव नाही, पण काही स्पेलिंग जोडण्याचा विचार केला जात आहे. 'कोईमोई' आणि 'सिने जोश'च्या रिपोर्ट्सनुसार अल्लू अर्जुन त्याचे नाव बदलण्याचा विचार करत आहे. सिने जोशमधील एका रिपोर्टनुसार, अल्लू अर्जुन अंकशास्त्रीय सल्ल्यानुसार त्याच्या नावात दोन 'यू' आणि दोन 'एन' जोडण्याची शक्यता आहे. अल्लू अर्जुनचे यश आणखी वाढवण्याचा आणि त्याची आधीच भरभराट होत असलेली कारकीर्द मजबूत करण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे. मात्र अभिनेत्याने अद्याप अधिकृतपणे या वृत्ताची पुष्टी केलेली नाही. दरम्यान, अल्लू अर्जुन त्याच्या आगामी प्रोजेक्ट्समुळे चर्चेत असतो. त्याच्याकडे एटलीचा पॅन इंडिया चित्रपट आहे. त्याचे शीर्षक अद्याप ठरलेले नाही. सध्या याला --२ असे नाव देण्यात आले आहे. ८ एप्रिलला अभिनेत्याच्या वाढदिवसादिवशी त्याची घोषणा होण्याची शक्यता आहे. याशिवाय अल्लूचा दिग्दर्शक त्रिविक्रम श्रीनिवाससोबत एक पौराणिक चित्रपट आहे. अल्लू अर्जुन या चित्रपटात भगवान कार्तिकेयची भूमिका साकारणार असल्याची चर्चा आहे. या चित्रपटाची निर्मिती मोठ्या पातळीवर केली जात आहे, जो तेलगूमध्ये आतापर्यंत न पाहिलेल्या अशा अंदाजात बनवला जातोय. चाहते अल्लू अर्जुनला 'पुष्पा ३'मध्ये पाहण्यासाठी उत्सुक आहेत. तिसर्या भागाची घोषणा 'पुष्पा २'मध्येच झाली होती.



# अशोकसारखा नवरा मिळणं हे गेल्या जन्मीचे पुण्य

अशोक सराफ आणि निवेदिता सराफ हे मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय कपल आहेत. त्यांच्याकडे आदर्श कपल म्हणून पाहिलं जातं. गेली कित्येक वर्ष ते दोघेही प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहेत. अनेक सिनेमांमध्येही ते एकत्र काम करताना दिसले. ही जोडी प्रेक्षकांची लाडकी आहे. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत निवेदिता सराफ यांनी अशोक सराफ यांच्यासारखा नवरा मिळणं हे भाग्य असल्याचं म्हटलं. निवेदिता सराफ यांनी मुलाखतीत त्या म्हणाल्या, मला असं वाटतं की गेल्या जन्मी काहीतरी पुण्यकर्म केलं होतं म्हणून मला अशोक सराफांसारखा नवरा आणि सासर मिळालं. कारण, आपल्या देशांमध्ये लग्न हे दोन व्यक्तींमध्ये नाही तर दोन कुटुंबांमध्ये होतं. त्यामुळे लग्न म्हणजे दोन कुटुंबांच एकत्र येणं असतं. जेव्हा माझे सासरे होते तेव्हा अशोक मला जोरात हाक मारायची पण हिंमत करू शकत नव्हते. ते त्यांना नेहमी म्हणायचे की मी तुझ्या आईशी असं वागताना कधी पाहिलं आहेस का?

दुर्देवाने माझे वडील आणि सासरे दोघंही खूप लवकर गेले. त्यामुळे त्यांचा फार सहवास मला मिळाला नाही. पण, माझ्या नणंदा...माझी मोठी नणंद अमेरिकेला असते त्या तिथेही माझी मालिका बघत आहेत. माझी दुसरी नणंद अजूनही माझं काम बघतात आणि त्या सगळ्यांनाच माझ्या कामाबद्दल फार कौतुकही आहे, असंही पुढे निवेदिता सराफ म्हणाल्या. दरम्यान, सध्या अशोक सराफ आणि निवेदिता सराफ टेलिव्हिजनच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहेत. निवेदिता सराफ या स्टार प्रवाह वाहिनीवरील 'आई आणि बाबा रिटायर होत आहेत' या मालिकेत मुख्य भूमिकेत आहेत.



# 'अवकारीका' चित्रपटाचे मोशन पोस्टर



स्वच्छ, देखण्या, निरोगी भारताची, पृथ्वी लखख करणाऱ्या दूतांची.. अशा टॅगलाईनसह आलेल्या 'अवकारीका' चित्रपटाच्या पोस्टरमध्ये कचर्याच्या ढिगार्यासमोर हातात झाडू घेऊन एक स्वच्छता दूत अगतिकपणे उभा असल्याचे दिसतंय. रेडबड मोशन पिक्चर या बॅनरअंतर्गत येत्या १३ जूनला प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या या चित्रपटाचे दिग्दर्शन अरविंद भोसले यांचे आहे. या चित्रपटाची निर्मिती भारत टिळेकर यांनी केली असून सहनिर्मिती मनोज गायकवाड, अरविंद भोसले, मृणाल कानडे, गीता सिंग यांची आहे. स्वच्छतेच्या माध्यमातून स्वतःच्या जगण्याचा रस्ता शोधणाऱ्या वेदनेचा हा शोध असला तरी समाजाला त्यांच्या श्रमाची जाणीव व्हावी, स्वच्छतेची प्रभावीपणे जागरूकता निर्माण व्हावी, याच संकल्पनेतून आणि भावनेतून 'अवकारीका' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अभिनेता विराट मडके 'अवकारीका' चित्रपटात स्वच्छतादुताच्या भूमिकेत दिसणार आहे. त्याच्यासोबत या चित्रपटात राहुल फलटणकर, रोहित पवार, विनोद खुरंगळे, पिया कोसुम्बकर, नितीन लोंढे, प्रफुल्ल कांबळे, स्नेहा बालपांडे तसेच बालकलाकार वैभवी कुटे, उन्नती माने, कार्तिकी बट्टे, आदी कलाकार मंडळी दिसणार आहेत. या चित्रपटाची कथा-पटकथा, संवाद, गीते अरविंद भोसले यांची आहेत. छायांकन करण तांदळे तर संकलन अथर्व मुळे यांचे आहे. सहदिग्दर्शक रेहमान पठाण तर कार्यकारी निर्माता चेतन परदेशी आहेत. संगीत श्रेयस देशपांडे यांचे असून गायक कैलास खैर, सुनिधी चौहान, ज्ञानेश्वर मेश्राम यांचे स्वर चित्रपटातील गीतांना लाभले आहेत.

# अशोक सराफांचा लवकरच 'अशी ही जमवा जमवी' येणार भेटीला


रंगभूमीचा चंदेरी रंगमंच असो वा चित्रपटाचा सोनेरी पडदा असो आपल्या बहारदार व चिरतरुण अभिनयाने मराठीसह हिंदी प्रेक्षकांचे मनोरंजन करणारे अभिनयसम्राट म्हणजे महाराष्ट्र भूषण आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ अशोक सराफ यांनी आजवर आपल्या अनेक विनोदी, तसेच गंभीर भूमिकांनी प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. प्रेक्षकांना आपल्या काम आणि अभिनयातून कायम नावीन्याची भेट देणारे अशोक सराफ त्यांच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहेत. अशोक सराफ आणि वंदना गुप्ते यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'अशी ही जमवा जमवी' चित्रपटाची काही दिवसांपासून सर्वत्र चांगलीच चर्चा सुरू आहे. अशोक सराफ आणि वंदना गुप्ते या दोन मुख्य कलाकारांसह अनेक कलाकारांची मांदियाळी या चित्रपटात आहे. काही दिवसांपूर्वी चित्रपटाचा टीझर समोर आला होता आणि तेव्हापासून चाहत्यांना चित्रपटाच्या ट्रेलरची उत्सुकता लागून राहिली होती. अशातच आता चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'अशी ही जमवा जमवी' चित्रपटाच्या या ट्रेलरमधून अशोक सराफ व वंदना गुप्ते यांचा एक वेगळा आणि हटके अंदाज पाहायला मिळत आहे. थोडी खट्याळ, थोडी गोंडस व थोडी हळवी अशी या चित्रपटाची कथा आहे. आजच्या तरुणाईबरोबरच प्रौढांनाही भावणारा आणि नवीन विचार मांडणारा हा चित्रपट असल्याचे ट्रेलरवरून दिसत आहे. अशोक सराफ व वंदना गुप्ते यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील खास मजा- मस्तीही या ट्रेलरमधून पाहायला मिळत आहे. राजकमल एंटरटेन्मेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते लिखित व दिग्दर्शित 'अशी ही जमवा जमवी' या चित्रपटातून फक्त तरुणांचीच नाही, तर वृद्ध मित्र-मैत्रिणींचीसुद्धा एक धमाकेदार कहाणी अनुभवायला मिळणार आहे. चित्रपटात अशोक सराफ, वंदना गुप्ते यांच्यासह चैत्राली गुप्ते, सुनील बर्वे, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर, तसेच नवोदित कलाकार तनिष्का विशे, ओमकार कुलकर्णी आदी कलाकार दिसणार आहेत. दरम्यान, 'कधी खट्याळ, कधी हृदयस्पर्शी, तर कधी मनसोक्त हसवणारी 'अशी ही जमवा जमवी' असे म्हणत ट्रेलर शेअर करण्यात आला आहे. ट्रेलरला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसादही मिळत आहे. येत्या १० एप्रिलपासून हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे आता या चित्रपटातील अशोक सराफ यांची हटके भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरणार का? तसेच वंदना गुप्ते व अशोक सराफ यांची जोडी काय कमाल करणार? हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.



# बॉलीवूडवर सध्या संकट घोंघावतय



बॉलिवूडमध्ये सध्या बरेच जुने चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्याचं सत्र सुरू आहे. पण, यामधील मोजक्याच चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद पाहायला मिळाला. 'सनम तेरी कसम', 'रॉकस्टार', 'रहना है तेरे दिल में' अशा काही चित्रपटांनी कोट्यवधींची कमाई केली. बॉलीवूडमध्ये सुरू असलेल्या सध्याच्या याच ट्रेंडविषयी बोलताना अभिनेता रणदीप हुड्डानं आपलं परखड मत व्यक्त केलं. एका मुलाखतीत रणदीप व हंसल यांना विचारलं गेलं की, पुन्हा प्रदर्शित झालेल्या चित्रपटांना बॉक्स ऑफिसवर चांगला प्रतिसाद का मिळत आहे? यावर हंसल मेहता म्हणाले, हे सोशल मीडियाचं काम आहे. पण, एखाद्याच पुन्हा प्रदर्शित झालेल्या चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. याचा अर्थ असा नाही की, सगळ्याच चित्रपटांना प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळतोय. पुढे रणदीप हुड्डा म्हणाला की, आता प्रत्येक जण ट्रेंडनुसार चालत आहे. मी याला 'भेड चाल' म्हणेल. एखादी गोष्ट चालायला लागली, तर त्याचंच अनुकरण केलं जात आहे. सगळेजण तेच करू इच्छितात. 'स्त्री' चित्रपटाच्या यशानंतर आता सगळ्यांना हॉरर कॉमेडी चित्रपट करायचे आहेत. एक अभिनेता म्हणून मला नाही वाटतं की, हे पॅरामीटर असलं पाहिजे. अशा प्रकारच्या बऱ्याच कारणांमुळे बॉलीवूडवर संकट घोंगावत आहे. पुढे रणदीप हुड्डा म्हणाला, आता चित्रपट कसा बनवला पाहिजे? हे महत्त्वाचं नसून चित्रपटाचं शिक्षण अधिक जास्त होत आहे. प्रयोग करण्यासाठी खूप कमी जागा आहेत. आता फक्त ओटीटीवर प्लॅटफॉर्मवरचं प्रयोग शक्य आहे आणि मला असं वाटतं, तेदेखील अशाच चित्रपटांच्या शोधात आहेत. कारण त्यांना प्रेक्षक आणि सबस्क्रिप्शन पाहिजे. ही एक व्यावसायिक गोष्ट आहे. त्याशिवाय रणदीपने २०२४ मध्ये आलेल्या स्वतःच्या 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपटविषयी सांगितलं. तो म्हणाला, मला स्वातंत्र्यसैनिक विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनाचा शोध घ्यायचा होता. ज्यांना जगानं चुकीचं ठरवलं. ते सखोल विचारवंत होते, जे अनेकांना समजू शकले नाहीत. मला वाईट वाटलं होतं की, आपला संपूर्ण स्वातंत्र्यलढा दोन-तीन नावांनी आणि अहिंसेपर्यंत मर्यादित ठेवला आहे; जो खरा नाही. त्यातून भारताची अत्यंत कमकुवत प्रतिमा जगासमोर मांडली, जसे आपण नाही आहोत. त्यांना हे कळायला हवं की, जर कोणी आपल्या कानशिलात लगावली, तर त्याचं आपण तोंड फोडू शकतो.




# 'सुर्यवंशम्'चा सिक्वेल येतोय?

बॉलिवूडचे शेहनाशह अमिताभ बच्चन यांनी आतापर्यंत अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. पण त्यांच्या एका चित्रपटाची चर्चा आजची पिढीदेखील करताना दिसते. तो चित्रपट म्हणजे 'सुर्यवंशम'. २१ मे १९९९ साली हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. सात कोटींमध्ये तयार झालेल्या या सिनेमाने त्यावेळी १२ कोटी ६५ हजारांचा गल्ला जमवला होता. अमिताभ बच्चन यांचा चित्रपटात डबल रोल होता. सूर्यवंशम हा सिनेमा १९९७ मध्ये आलेल्या तामिळ सिनेमा 'सूर्यवमसम'चा रिमेक होता. 'सेट मॅक्स' या वाहिनीने हा चित्रपट अजरामर केला आहे. यामुळेच सोशल मीडियावर हा चित्रपट नेहमी चर्चेत असतो. बाप-मुलाच्या नात्यात असलेला दुरावा आणि प्रेम यामुळे आजही हा सिनेमा प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे.

नुकतंच या सिनेमाबद्दल सर्वात मोठी अपडेट समोर आली आहे. तुम्हाला तर माहितीच आहे हा चित्रपट सोनी मॅक्स वाहिनीवर टीव्हीवर येतो. आता मॅक्सची सोशल मीडियावर एक पोस्ट समोर आली आहे, त्यानंतर 'सूर्यवंशम'च्या सिक्वेलबद्दल चर्चा सुरू झाली आहे. सोनी मॅक्सच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक पोस्टर शेअर करण्यात आली आहे, ज्यावर 'सूर्यवंशम २' लिहिले आहे. पोस्टर असेही लिहिले आहे की, हिरा पुन्हा चमकेल. ट्रेलर लवकरच येत आहे. आता सोशल मीडियावर बरीच चर्चा आहे की या चित्रपटाचा दुसरा भाग प्रदर्शित होणार आहे. मात्र, अमिताभ बच्चन किंवा निर्मात्यांनी अद्याप अशी कोणतीही माहिती शेअर केलेली नाही. चॅनेलने त्यांच्या पोस्टला कॅप्शन दिले आहे, तुम्ही येताना पाहिले नसेल, पण ते येत आहे. भानू प्रताप सिंह आणि हीरा ठाकूर यावेळी नव्याने सुरुवात करतील की त्यांच्या नात्यात तडा जाईल? जाणून घेण्यासाठी थोडी वाट पहा. 'सूर्यवंशम २' फक्त सोनी मॅक्सवर येत आहे. या पोस्टचा अर्थ काय? 'सूर्यवंशम'चा सिक्वेल खरंच येणार आहे का? किंवा कदाचित या पोस्टचा काही वेगळा अर्थ असेल, या सर्व प्रश्नांची उत्तरे भविष्यातच मिळतील.

# रेड:२ मध्ये तमन्ना करणार आयटम साँग



रेड चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची घोषणा झाली असून या चित्रपटाचे पोस्टर आणि टीझर समोर आला आहे. यामधून रेड २ मध्ये असणाऱ्या कलाकारांची नावंही जाहीर झाली आहेत. या चित्रपटाच्या टीझरने प्रेक्षकांमध्ये चांगलीच उत्कंठा निर्माण केली आहे. त्यानंतर हा चित्रपट प्रदर्शित होण्याची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत असतानाच आता एक मोठी अपडेट समोर आली आहे. तमन्ना भाटियाला रॅपर यो यो हनीसिंगसोबत हाय-एनर्जी डान्स ट्रॅकवर आयटंम सॉंग करणार असल्याची माहिती आहे. या गाण्याची कोरिओग्राफी विजय गांगुली हे करणार आहेत. या गाण्याचे शूटिंग मुंबईतील एका प्रसिद्ध स्टिडिओमध्ये केले जाणार आहे. यामुळे स्त्री २ नंतर तमान्ना रेड २ मध्ये आयटम सॉंगवर थिरकताना दिसणार आहे.

या चित्रपटात अभिनेता अजय देवगण IRS अधिकारी अमय पटनायकच्या भूमिकेत असणार आहे. यामुळे आता या चित्रपटातील तमन्नावर चित्रित होणाऱ्या गाण्याविषयी प्रेक्षक अत्यंत उत्सुक झाले आहेत. राज कुमार गुप्ता दिग्दर्शित आणि रितेश शाह, करण व्यास आणि जयदीप यादव यांच्या टीमने लिहिलेला रेड २ चित्रपटात अमेय पटनायक यांनी टाकलेल्या ७५ व्या धाडीवर आधारित असणार आहे. यावेळी छापा हा रितेश देशमुखने साकारलेल्या दादाभाई नावाच्या शक्तिशाली व्यक्तीच्या घरावर टाकण्यात येणार आहे. या चित्रपटात अजय आणि रितेश पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करताना दिसणार आहेत. याशिवाय चित्रपटात वाणी कपूर, रजत कपूर, सुप्रिया पाठक, अमित सियाल आणि यशपाल शर्मा यांच्याही भूमिका आहेत. सौरभ शुक्ला सीतागडचा भयानक डॉन तौजीची भूमिका पुन्हा साकारणार आहे.



# मनोज कुमार यांना 'या' चित्रपटांनी बनवले सुपरस्टार

बॉलिवूड अभिनेते आणि दिग्दर्शक मनोज कुमार यांना 'भारत कुमार' म्हणून ओळखले जात होते आणि त्याचे कारण त्यांचे देशभक्तीपर चित्रपट होते. मनोज कुमार यांनी १९५७ मध्ये फॅशन या चित्रपटाद्वारे अभिनयाच्या जगात प्रवेश केला. जरी त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक चित्रपट केले असले तरी, आज आपण त्यांच्या काही लोकप्रिय चित्रपटांबद्दल जाणून घेणार आहोत.

**शहीद:-** हा चित्रपट शहीद भगतसिंग यांच्यावर आधारित आहे. खरंतर, भगतसिंगांच्या जीवनावर अनेक चित्रपट बनले आहेत आणि ही मालिका सुरूच आहे. पण, मनोज कुमारांचा 'शहीद' हा चित्रपट आयकॉनिक मानला जातो. मनोज कुमारच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांमध्ये हा चित्रपट गणला जातो. यासाठी त्याला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला.

**उपकार:-** हा चित्रपट स्वतः मनोज कुमार यांनी दिग्दर्शित केला होता. या कल्ट क्लासिक चित्रपटात भारतीय आणि पाश्चात्य संस्कृतीतील फरक दाखवण्यात आला आहे. 'उपकार' या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी 'उपकार' बनवला. त्यांचा चित्रपट 'जय जवान जय किसान' वर आधारित होता.

**पत्थर के सनम:-** 'पत्थर के सनम' या चित्रपटाचे दिग्दर्शन राजा नवाथे यांनी केले होते. या चित्रपटात मनोज कुमारसोबत वहिदा रहमान दिसली होती. याशिवाय मुमताज आणि प्राण हे देखील चित्रपटाचा एक भाग होते. हा चित्रपट एका प्रेम त्रिकोणावर आधारित होता. या ॲक्शन- ड्रामा संगीतमय चित्रपटाला प्रेक्षकांनी चांगलीच पसंती दिली.

**पूरब और पश्चिम:-** मनोज कुमारचा हा चित्रपट देशभक्तीवर आधारित होता. किंवा मनोज कुमार या चित्रपटात, मोठ्या स्टारकास्टसह, त्यांनी ब्रिटिश राजवटीत होणारे अत्याचार दाख मनोज कुमार व्यतिरिक्त दिलीप कुमार, शत्रुघ्न सिन्हा, शशी कपूर, हेमा मालिनी यांसारख्या कलाकारांनी चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्याची निर्मिती आणि दिग्दर्शन स्वतः मनोज कुमार यांनी केले असते. रिपोर्ट्सनुसार, चित्रपट बनवण्यासाठी सुमारे ३.१ कोटी रुपये खर्च आले किंवा चित्रपाने भारतने १० कोटी रुपये कमाविले.

**रोटी कपड़ा और मकान:-** मनोज कुमार यांनी स्वतः या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी घेतली. या चित्रपटात त्याच्यासोबत सायरा बानो दिसल्या होत्या. तो त्या वर्षीचा बॉक्स ऑफिसवरचा एक प्रचंड हिट चित्रपट होता. मीडिया रिपोर्ट्सनुसार, चित्रपटाने सुमारे ४.५ कोटी रुपये कमावले होते. हा चित्रपट त्यांच्यासाठी खास आहे जे देशापासून दूर आहेत पण त्यांच्या हृदयात भारत आहे. मनोज कुमार यांनी चित्रपटाच्या निर्मितीची जबाबदारीही घेतली. या चित्रपटात परदेशात स्थायिक झालेल्या आणि देशाला विसरलेल्या अनिवासी भारतीयांनाही दाखवण्यात आले.

**क्रांति:-** मनोज कुमारच्या सर्वात मोठ्या हिट चित्रपटांमध्येही याची गणना होते. या चित्रपटाच्या नावावरूनच अंदाज लावता येतो की हा चित्रपट फक्त अन्न, कपडे आणि निवारा याबद्दल बोलतो. जेव्हा भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झाले तेव्हा त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवरही झाला. या चित्रपटात त्या काळातील लोकांच्या खऱ्या समस्या आणि देशाच्या कल्याणासाठी काम करण्याची त्यांची आवड पडद्यावर सुंदरपणे दाखवण्यात आली आहे. हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला.

# मनोज कुमार नसते तर अमिताभ सुपरस्टार नसते



'पूरब और पश्चिम', 'रोटी, कपडा और मकान' आणि 'क्रांती' सारखे उत्कृष्ट चित्रपट देणारे ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी मुंबईत निधन झाले. मनोज कुमार म्हणजेच हरि किशन गिरी गोस्वामी. हो, हेच मनोज कुमारचे खरे नाव होते. दिलीप कुमार यांचा उल्लेख न करता मनोज कुमारबद्दल कसे बोलता येईल? मनोजच्या बालपणीचा एक प्रसंग आहे. शाळेत शिकत असताना मनोज दिलीप कुमार यांचा 'शबनम' हा चित्रपट पाहण्यासाठी गेला आणि त्याच्या व्यक्तिरेखेने तो इतका प्रभावित झाला की त्याने त्याच व्यक्तिरेखेवरून स्वतःचे नाव मनोज कुमार ठेवले. ज्या काळात लोकांना एखाद्या अभिनेत्याला रोमँटिक भूमिकेत पाहणे आवडत असे, त्या काळात मनोज कुमार देशभक्तीपर चित्रपटांकडे वळले. बहुतेक चित्रपटांमध्ये त्यांच्या व्यक्तिरेखेचे नाव भारत होते, त्यामुळे लोक त्यांना 'भरत कुमार' असेही म्हणू लागले. त्यांनी १९५७ मध्ये 'फॅशन' या चित्रपटातून अभिनेता म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. हिंदी चित्रपटसृष्टीत भरत कुमार म्हणून प्रसिद्ध असलेले मनोज कुमार, चित्रपट निर्मितीच्या बाबतीत एक उत्तम अभिनेते होते त्यापेक्षा त्यांच्या काळात ते एक चांगले अभिनेते होते. मनोज कुमार यांना देशभक्तीची इतकी आवड होती की त्यांनी ती त्यांच्या चित्रपटांमधून लोकांसमोर आणली. मनोज कुमार यांनी देशभक्तीपर चित्रपट बनवून हे सिद्ध केले की अशा चित्रपटांमधूनही पैसे कमवता येतात. 'शहीद' चित्रपटाबद्दल असे म्हटले जाते की मनोज कुमार या चित्रपटात शहीद भगतसिंग यांची भूमिका साकारणार होते, या चित्रपटासाठी मनोज शहीद भगतसिंग यांच्या आईला भेटायलाही गेला होता. सर्व आवश्यक माहितीनंतर, जेव्हा मनोज कुमारने त्यात काम केले आणि चित्रपट प्रदर्शित झाला, तेव्हा १९६५ चा शहीद बॉक्स ऑफिसवर हिट ठरला. मनोज कुमारचा अभिनय लोकांना खूप आवडला, त्यानंतर मनोज कुमारने कधीही मागे वळून पाहिले नाही. शहीद चित्रपटातील गाणेही मनोज कुमारच्या विनंतीवरून गीतकार प्रेम धवन यांनी लिहिले होते. जेव्हा अमिताभ बच्चन मुंबई सोडून दिल्लीतील त्यांच्या पालकांकडे परत जात होते, तेव्हा त्यांच्या सततच्या अपयशी चित्रपटांमुळे ते अस्वस्थ झाले होते, तेव्हा मनोज कुमार यांनीच अमिताभ यांना थांबवले आणि त्यांच्या 'रोटी, कपडा और मकान' या चित्रपटात संधी दिली. कथाकथनकार म्हणून फक्त ११ रुपये मानधन घेणाऱ्या मनोज कुमार यांना चित्रपटांमधील उत्कृष्ट अभिनयासाठी दादासाहेब फाळके, पद्मश्री, फिल्मफेअर जीवनगौरव यासारख्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. शाहरुखने त्याच्या 'ओम शांती ओम' चित्रपटात मनोज कुमारची नक्कल करणारा एक दृश्य समाविष्ट केल्यावर मनोज कुमार शाहरुख खानवर रागावले. परंतु नंतर शाहरुखने त्याची माफी मागितली आणि मनोज कुमारनेही त्याला माफ केले.



